# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 05 October 2024

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०५ ऑक्टोबर २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- पंतप्रधान नरेंद्र मोदी आज वाशिम तसंच ठाणे दौऱ्यावर–विविध प्रकल्पांचं उद्धाटन आणि पायाभरणी
- राज्यात अकृषिक कर पूर्णपणे माफ–संत भगवान बाबा ऊसतोड कामगार अपघात विमा योजना लागू करण्याचा राज्यमंत्रिमंडळाचा निर्णय
- रेल्वेच्या खाजगीकरणाच्या सर्व चर्चा निराधार–रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडून स्पष्ट
- आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांवरून ७५ टक्क्यांवर नेण्याची शरद पवार यांची मागणी
- अहमदनगरचं अहिल्यानगर नामकरण करण्याला केंद्र सरकारची मंजुरी

आणि

- छत्रपती संभाजीनगर महापालिकेकडून नवरात्रात प्रसवपूर्व लिंगनिदान प्रतिबंधक कायद्याबाबत जनजागृती

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज वाशिम तसंच ठाणे जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात वाशिम इथं २३ हजार ३०० कोटी रुपयांच्या तर ठाणे इथं ३२ हजार ८०० कोटी रुपयांच्या विविध नागरी विकास प्रकल्पांचं उद्धाटन आणि पायाभरणी पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा १८ वा हप्ता यावेळी जारी करण्यात येईल. प्रधानमंत्री कृषी पायाभूत सुविधा निधी अंतर्गत सुमारे एक हजार ९२० कोटी रुपयांचे प्रकल्प ते राष्ट्राला समर्पित करतील. पोहरादेवी इथं "बंजारा विरासत संग्रहालयाचं" उद्‌घाटन पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

मुंबई मेट्रोच्या नव्या टप्प्याचं उद्घाटन, ठाणे मेट्रो प्रकल्पांची पायाभरणी तसंच नवी मुंबई विमानतळ प्रभाव क्षेत्राच्या विकासासाठी नैना प्रकल्पाची पायाभरणी पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

वाशिम दौऱ्यासाठी पंतप्रधानांचं आज सकाळी नांदेड इथं श्री गुरूगोविंदसिंगजी विमानतळावर आगमन होईल, तिथून ते पोहरादेवीकडे प्रयाण करतील. दुपारी २ वाजेच्या सुमारास पंतप्रधान नांदेड विमानतळावरून मुंबईकडे रवाना होणार आहेत.

****

राज्यातील अकृषिक कर पूर्णपणे माफ करण्यात आला आहे. काल झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. वाणिज्य आणि औद्योगिक वापराखालील जमिनीवरील अकृषिक करही रद्द करण्यात येईल, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

राज्यात प्राचीन तसंच ऐतिहासिक वास्तूंचं नुकसान केल्यास दोन वर्षांचा तुरूंगवास आणि एक लाख रुपये दंडाची तरतूद करण्याचा निर्णय काल मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

राज्यातील सर्व ऊसतोड, वाहतूक कामगार आणि मुकादमांना झोपडी तसंच बैल जोडीकरता विमा संरक्षण देण्यासाठी संत भगवान बाबा ऊसतोड कामगार अपघात विमा योजना राबवण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. साखर कारखान्यांकडून ऊस गाळपावर प्रतिवर्षी प्रति मेट्रीक टन दहा रुपयांप्रमाणे मिळणाऱ्या निधीतून या विमा योजनेसाठी खर्च करण्यात येईल.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पूर्णा नदीवर दहा साखळी बंधाऱ्यांच्या कामांना राज्यमंत्रिमंडळाने मान्यता दिली. यामुळे सिल्लोड तालुक्यातल्या १२ गावांमधल्या सुमारे दीड हजार हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार आहे. यासाठी येणाऱ्या ५३४ कोटी ९२ लाख रुपयांच्या खर्चालाही मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यात गाळमुक्त धरण आणि गाळमुक्त शिवार योजना कायमस्वरूपी राबवण्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली. हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क स्थापन करण्यासही काल मान्यता देण्यात आली.

जैन, बारी, तेली, हिंदू-खाटीक, लोणारी या समाजांसाठी आर्थिक विकास महामंडळांची स्थापना करणं, खेळाडू आणि त्यांच्या प्रशिक्षकांच्या पारितोषिकांच्या रक्कमेत वाढ करणं, राज्यात आरोग्य क्षेत्रात उत्कृष्टता केंद्र स्थापन करणं, महाराष्ट्र

आरोग्य विज्ञान विद्यापीठात पात्र शिक्षकेतर अधिकारी तसंच कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत दोन लाभांची आश्वासित प्रगती योजना लागू करणं, आदी निर्णयही मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आले.

****

रेल्वेच्या खाजगीकरणाच्या सर्व चर्चा निराधार असल्याचं, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी स्पष्ट केलं आहे. काल नाशिक इथं केंद्रीय रेल्वे सुरक्षा दलाच्या चाळीसाव्या स्थापना दिवस कार्यक्रमात ते बोलत होते. गरीब आणि मध्यमवर्गीयांच्या प्रवासाचं साधन म्हणून रेल्वे कडे पाहिलं जातं, या दृष्टीनेच केंद्र सरकारने गेल्या दहा वर्षात रेल्वेमध्ये आर्थिक, संशोधन, सुरक्षा आणि मनुष्य बळाच्या माध्यमातून गुंतवणूक केल्याची माहिती वैष्णव यांनी दिली.

****

अनुसूचित जमातीच्या आरक्षणास धक्का लागू नये, यासह अन्य मागण्यांसाठी विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्यासह दोन आमदारांनी काल मंत्रालयातल्या संरक्षक जाळीवर उड्या मारल्या. त्यामुळे मंत्रालय परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता. पोलिसांनी या सर्व लोकप्रतिनिधींना सुखरूपपणे जाळीबाहेर काढलं. त्यानंतर आपल्या मागण्यांसाठी झिरवळांसह सर्वांनी ठिय्या आंदोलन केलं.

****

केंद्र सरकारने आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांवरून ७५ टक्क्यांवर नेण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी केली आहे. ते काल सांगली इथं पत्रकारांशी बोलत होते. यासाठी संसदेत सरकारने विधेयक आणल्यास आपण पाठिंबा देऊ, असं पवार यांनी सांगितल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

महायुती आणि महाविकास आघाडीने मिळून आचारसंहिता लागण्यापूर्वी मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी केली आहे. ते काल जालना जिल्ह्यात आंतरवाली सराटी इथं वार्ताहरांशी बोलत होते. दसऱ्याला बीड जिल्ह्यातल्या नारायणगड इथं सामाजिक मेळाव्याचं आयोजन केल्याची माहिती त्यांनी दिली.

****

मराठा आरक्षण उपसमितीचे सदस्य सुभाष जावळे यांनी मराठा आरक्षणासंदर्भात विविध मागण्यांसाठी परभणी इथं पुकारलेलं उपोषण काल दहाव्या दिवशी मागे घेतलं. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि प्रवीण दरेकर यांनी काल जावळे यांची उपोषणस्थळी भेट घेऊन त्यांच्या मागण्यांसंदर्भात बैठक घेण्याचं आश्वासन दिलं. येत्या मंगळवारी मुंबईत ही बैठक घेणार असल्याचं, पाटील यांनी सांगितलं. ते म्हणाले...

***''मंगळवारी दुपारी ३ वाजता सह्याद्रीवर आम्ही बैठक बोलावत आहोत, तीन रिटायर्ड जज ची कमिटी जी अपॉइंट झालेली आहे, टॉपचे जजेस आहेत. त्या बैठकीला मंगळवारी त्या तीन रिटायर्ड जजेसना आम्ही बोलावतो आहोत. एकदा एसीबीसीचं आरक्षण दिलं की म्हणजे जातीचं दिलं की पुन्हा आर्थिक मागासचं आरक्षण देता येत नाही.तरीही कायदेशीर मार्ग काय काढता येईल,याचा विचार आम्ही नक्की करू.''***

****

माजी मंत्री, भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. काल इंदापूर इथं पत्रकार परिषदेत पाटील यांनी ही घोषणा केली.

****

तिरुपती तिरुमला इथल्या श्री व्यंकटेश्वर स्वामी मंदिरात प्रसादाच्या लाडूमधल्या कथित भेसळ प्रकरणी स्वतंत्र विशेष तपास पथक – एसआयटी स्थापन करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं दिले आहेत. यासंदर्भात काल झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयानं, याप्रकरणी आरोप – प्रत्यारोपांच्या आधारे कोणतंही निरीक्षण नोंदवलेलं नसून, न्यायालयाच्या निर्णयाला राजकीय रंग देऊ नये, असं नमूद केलं आहे.

****

छत्तीसगड जिल्ह्यातल्या नारायणपूर इथे काल सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत सुमारे २८ नक्षलवादी मारले गेले. पोलिसांच्या नक्षलविरोधी पथकाची शोधमोहीम सुरू असतांना ही चकमक झाली. घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्र हस्तगत करण्यात आली आहेत.

****

अहमदनगर जिल्ह्याचं अहिल्यानगर असं नामांतर करण्याच्या प्रस्तावाला केंद्र सरकारने मंजूरी दिली आहे. महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काल ट्विट संदेशातून ही माहिती दिली. या निर्णयाबद्दल विखे पाटील यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाचे आभार व्यक्त केले आहेत.

****

गर्भधारणापूर्व तसंच प्रसवपूर्व लिंगनिदान प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीसाठी छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या वतीनं नवरात्रोत्सवाच्या काळात जनजागृती केली जात आहे. शहरात कर्णपुरा परिसरात भरलेल्या यात्रेत बेटी बचाओ बेटी पढाओ ही ध्वनिफीत ऐकवली जात आहे. गर्भलिंगनिदान किंवा स्त्री भ्रूण हत्येसंदर्भात माहिती देण्यासाठी टोल फ्री क्रमांक, संकेतस्थळाचं बॅनर तसंच माझी मुलगी ही कविता प्रदर्शित करण्यात आली आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात अतिवृष्टीने नुकसान झालेला एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची काळजी घ्यावी, असे निर्देश पालकमंत्री तानाजी सावंत यांनी दिले आहेत. काल धाराशिव इथं आढावा बैठकीत ते बोलत होते. तुळजापूर इथे शारदीय नवरात्र महोत्सवादरम्यान दर्शनाला येणाऱ्या भाविकांची कोणत्याही प्रकारे गैरसोय होणार नाही यासाठी संबंधित यंत्रणांनी सतर्क राहून काम करावं असे निर्देश सावंत यांनी दिले आहेत. दरम्यान, तुळजाभवानी देवीच्या परवा सोमवारपासून विविध अलंकार महापूजा बांधल्या जाणार आहेत.

****

बुलडाणा जिल्ह्यात सिंदखेडराजा तालुक्यातील साखरखेर्डा इथे २७५ जणांना काल भगरीतून विषबाधा झाली. या सर्वांवर साखरखेर्डा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार केल्यानंतर घरी सोडण्यात आलं. परभणी जिल्ह्यातल्या जिंतूर तालुक्यातही काही जणांना काल भगरीतून विषबाधा झाल्याचं वृत्त आहे.

****

नांदेड जिल्ह्यातल्या शाळांमध्ये पायाभूत सुविधा वाढवण्यासाठी शासन स्तरावरून सर्वतोपरी प्रयत्न करण्याचं आश्वासन खासदार अशोक चव्हाण यांनी दिलं आहे. नांदेड इथं जिल्हा परिषदेच्या शिक्षक पुरस्कार प्रदान कार्यक्रमात काल ते बोलत होते. यावेळी शंभर शिक्षकांना मानपत्र, स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आलं.

****

दुबईतल्या शारजा इथे सुरु असलेल्या महिला टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल न्यूझीलंडनं भारताचा ५८ धावांनी पराभव केला. तर दक्षिण आफ्रिकेनं वेस्ट इंडिजचा १० गडी राखून पराभव केला. आज या स्पर्धेत अ गटात ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंका तर ब गटात इंग्लंड आणि बांगलादेश यांच्यात सामना होणार आहे.

****